
# वल्लभदास वालजी लायब्ररी जळगांव

## स्थापना सन १८७७

## हीरक महोत्सव

# अहवाल




प्रकाशक— हरी विष्णु कोल्हटकर
बी. ए. एल एल. बी.
अध्यक्ष– व. वा. लायब्ररी जळगांव

मुद्रक— चौधरी ब्रदर्स आणि कं. यांनी आपले जळगांव येथील
सहजानंद ट्रे. कं. लि. चे छापखान्यांत छापिलें.

# वल्लभदास वालजी लायब्ररी जळगांव

# ६० वर्षांचा अहवाल

## हीरक-महोत्सव

ही सस्था ता. १ जुलई १८७७ साली **नेटिव्ह जनरल लायब्ररी** या नावानें स्थापन झाली. त्यावेळीं या संस्थेचे फक्त १० समासद होते. या लायब्ररीची एक लहानशी इमारत होती ती लायब्ररीनें बदलून दुसरी नवी इमारत चांगलें हवाशीर ठिकाणीं बांधावी असा विचार चालकांचें मनांत सन १८८८-८९ चे सुमारास आला. त्या सुमारास मे. पोलनसाहेब हे जळगांवीं आले तेव्हां त्यांनीं असें सुचविलें कीं, मुळजीजेठा शेट यांचे पुतणे सुप्रसिद्ध व श्रीमंत गृहस्थ **कै. वल्लभदास वालजी शेट यांचे स्मारकाकरितां** वर्गणी जमवून लायब्ररीची नवी इमारत बांधावी व तिला त्यांचें नांव द्यावें. त्याप्रमाणें स्मारक-कमिटी नेमली गेली. तिनें वर्गणी गोळा केली म्युनिसिपल कमिटीनें लायब्ररीची त्यावेळची इमारत विकत घेऊन त्याबद्दल रुपये ९०० व देणगी म्हणून रु. ९०० देऊन दा कार्यास प्रोत्साहन दिलें, व कायमची इमारत बांधण्यासाठीं जागामिळणेसाठीं खटपट सुरू झाली.

ता. २३-३-१८९१ रोजीं लायब्ररीची जागा खरेदी घेऊन ठरल्याप्रमाणें रु. १००० म्युनिसी-पालिटीनें दिले. ता. २८-३-१८९६ रोजीं मे. मुळजीजेठा कंपनीचे एजंट भाई जीवराज शेट यांनीं पत्र लिहून कळविलें कीं, लायब्ररीस मदत देण्यास आम्ही तयार आहों परंतु जागा, प्लान, एस्टीमेट वगैरे नक्की झाल्यावर किती मदत मिळेल हें ठरेल. अशा अनिश्चित परिस्थितींत लायब्ररी म्युनिसिपालीटीच्या ऑफिसच्या एका लहानशा भागांत होती. नोव्हेम्बर १९०६ पासून जळगांव हें पूर्व खानदेशचें जिल्ह्याचें ठिकाण झाल्यामुळें लायब्ररीस उर्जित दशा येईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं. याच सालीं मे. मुळजीजेठा पेढीचे मालक शेट करसनदास धरमसी यांनीं रु. ४००० देण्याचें कबूल केलें.

ता. २८-५-१९०७ रोजीं म्युनिसिपालिटीनें असा ठराव केला कीं,

१ हल्लीं असलेली इंग्रजी शाळेची इमारत सभोंवतालचे कंपाउंडसुद्धां द्यावी व तेथें एक टाऊन-हॉल व लायब्ररीसाठीं इमारत बांधण्यांत यावी. टाऊन-हॉलास "लॅमिंग्टन टाऊन-हॉल" व लायब्ररीस "शेट लुभदास वालजी नेटिव्ह जनरल लायब्ररी" अशी नांवें देण्यांत यावीं.

२ जरूर त्या सव सुधारणा करण्याकरितां लायब्ररी-कमिटीनें पुरेसे पैसे गोळा करावें.

३ एक मध्यवर्ती हॉल, लायब्ररीकरितां जागा, बिलियर्ड रूम व कपडे बदलण्याच्या खोल्या यांची सोय इमारतीचे आंत करावी व बाहेर एक पोर्च व्हरांडा व खुल्या जागेंत जरूर पडेल त्याप्रमाणें टेनिसकोर्ट अशी तरतूद व्हावी.

४ लायब्ररी कमिटीचें अस्तित्व नाहींसें झाल्यास अगर तिचेकडून गैरवर्तन झाल्यास म्युनिसि-पालिटीचे इमारतीवर व जागेवर असलेले हक्क सुरक्षित राखण्यांत यावें.

या ठरावाप्रमाणें व शर्तींप्रमाणें कायदेशीर दस्तऐवज करण्याकरितां म्युनिसिपालिटीनें एक कमिटी नेमली परंतु पुढें दस्तैवज झाल्याचा आढळ होत नाहीं.

या ठरावाप्रमाणें म्युनिसिपालिटीनें ता. ८-४-१९०८ रोजीं मे. कलेक्टरसाहेब यांस पत्र लिहून नेटिव्ह जनरल लायब्ररीला इंग्रजी शाळेची इमारत व सभोंवतालचें कंपाउंड ट्रान्सफर करून

देण्याबद्दल व मे. कमिशनरसाहेब मध्यभाग यांची मंजुरात मिळण्याबद्दल पत्र लिहिलें व मे. कमिशनर साहेब मध्यभाग यांनी ता. २८-९-१९०८ रोजीं मंजुरात दिली.

या ठरावाप्रमाणें म्युनिसिपालिटीनें उदार होऊन सदरील जागा दिली. या ठरावास मे. कमिशनर साहेब यांची मंजुरात येण्यापूर्वीच ता. ४।६।१९०७ रोजीं मुंबई इलाखाधिपति नेक नामदार **लॉर्ड लॅमिंग्टन** यांचे जळगांवीं **आगमन** झालें त्यावेळीं त्यांनीं या इमारतीची **कोनशिला बसविली.**

सन १९०७ सालांत इमारतीचे प्लान, एस्टिमेट तयार झालें व इमारतीस सुमारें ११९०० रु. लागतील असा अंदाज केला गेला. सन १९०८ मध्यें इमारतीचें काम सुरू झालें तें मेसर्स गोडबोले आणि कंपनीकडे दिलेलें होतें व त्या कामावर P. W. D. Overseer श्री. साठे यांची देखरेख होती

लायब्ररी बिल्डिंगकडे, रु. ४००० **लायब्ररीची शिल्लक**, रु. ४००० **मे. मुळजी जेठा कंपनीची देणगी, व रु ४००० भगीरथ रामचंद्र शेट यांनीं** आपले वडील रामचंद्र हुकुमीचंद शेट व मातोश्री गोरजाबाई यांचे नांवानें **दिलेली देणगी** मिळून रु. १२००० अशा ठोकळ रकमांचा विनीयोग झाला लॅमिंग्टन टॉऊन-हॉल, लायब्ररी, जिमखाना व टेनिस कोर्टें व टेबलें वगैरे कामाकरितां एकंदर खर्च रु. १२,९०९-७-२ झाला. इमारतीचें काम १९०९ सालांत पुरें होऊन जी लायब्ररी म्युनिसिपल ऑफिसच्या लहानशा खोलींत ३२ वर्षें पर्यंत होती ती या वर्षीं स्वतंत्र इमारतींत आली व या वर्षापासून **वल्लभदास वालजी लायब्ररी** हें नांव तिला प्राप्त झालें. याच वर्षीं लायब्ररीचे इमारतीवर खालील संगमरवरी फलक बसविण्यांत आला.

---

**लॅमिंग्टन टाऊन हॉल व वल्लभदास वालजी जनरल लायब्ररी व रामचंद्र हूकमीचंद आणि गोरजाबाई जिमखाना** जळगांव १९०९.

**कॉटन मार्केट या नांवाची मूळची इमारत जळगांव म्युनिसिपालिटीनें बक्षिस दिली व मे. मुळजीजेठा कंपनी, मुंबई धामणगांव तालुके जळगांव येथील रहिवासी, शेट भगीरथ रामचंद्र यांनीं दिलेल्या उदार देणग्यांची भर पडलेल्या जळगांव नेटिव्ह जनरल लायब्ररीचे रकमेंतून या इमारतीची पुष्कळच वाढ व फेरफार करण्यांत आला आहे.**

**या इमारतीची कोनशीला नेक नामदार लॉर्ड लॅमिंग्टन** C C. M. G. G. C. I E. B. A. ( oxon ) **मुंबईचे गव्हर्नर यांनीं ता. ४ जून १९०७ रोजीं बसविली.**

---

अशातऱ्हेनें मूळ योजनेप्रमाणें कार्यसिद्धी झाली परंतु शेट भगीरथ रामचंद्र यांनीं देणगी म्हणून दिलेले रु. ४००० चा विनियोग जिमखाना शाखेकडे व्हावा अशी त्यांनीं इच्छा प्रदर्शित केली असवी. त्याप्रमाणें या इमारतीचे दक्षिणेकडील भाग जिमखान्याचे स्वतंत्रपणें उपभोगांत येऊन त्यास रामचंद्र हुकमीचंद व गोरजाबाई जिमखाना असें नांव देण्यांत आलें. व तेव्हांपासून जिमखान्याचे जमाखर्च व व्यवस्था निराळी झाली, व म्युनिसिपालिटीनें जिमखान्याचे उपभोगांत असलेल्या जागेचें व इमारतीचे भागाचें जिमखान्यास ता. २६-३-१९१९ रोजीं बक्षिसपत्र लिहून नोंदून दिलें.

लायब्ररी व टाऊन हॉल यांची व्यवस्था मात्र लायब्ररीकडे राहिली. टाऊन हॉलकरितां नियम लायब्ररीचे वार्षिक-साधारण सभेंत तयार करण्यांत आले. त्याप्रमाणें जिमखान्यातर्फे २, भगीरथ शेटतर्फे १, मुळजी कंपनीतर्फे १, व लायब्ररीतर्फे २ अशा ६ गृहस्थांचे कमिटीनें टाऊन हॉलची व्यवस्था केली. टाऊन हॉल वापरण्यास दिला त्याचें भाडें लायब्ररीकडे जमा होत गेलें.

लायब्ररी ता. २८-२-१९१२ रोजीं रजिस्टर्ड लायब्ररी म्हणून सरकारनें मंजूर केली.

ता. २८-९-१९०७ चे म्युनिसिपालिटीचे ठरावाप्रमाणें किंवा २६-३-१९१९रोजीं म्युनिसिपाली-टीनें जिमखान्यास बक्षिस पत्र करून दिलें त्यावळीं, कायदेशीर दस्तैवज लायब्ररीस करून दिला नाहीं. १९३२ सालांत टाऊन हॉलचें रूफ जीर्ण झाल्यामुळें तें ताबडतोब काढून टाकण्याविषयीं म्युनिसिपालिटीनें लायब्ररीस कळविलें. ता. १६-२-३३ रोजीं म्युनिसिपालिटीनें असा ठराव केला कीं, 'टाऊन-हॉलची इमारत म्युनिसिपालिटीनें आपले ताब्यांत घ्यावी, व धोका होणार नाहीं अशी व्यवस्था ताबडतोब करावी. इमारत पूर्वी ठरलेल्या शर्तींप्रमाणें योग्य स्थितींत न ठेवल्यामुळें लायब्ररीची इमारत व जागा म्युनिसिपालिटीनें आपले कबजांत घेणेंबद्दल चीफ ऑफिसरांनीं योग्य ती तजवीज करावी. या ठरावाची अमलबजावणी म्युनिसिपालीटीनें करूं नये अशी विनंति करण्यांत आली, व टाऊनहॉल कमिटीची सभा बोलावण्यांत आली. तसेंच म्युनिसिपालिटीनेंही या गोष्टीचा विचार करण्याकरितां एक सबकमिटी नेमली व त्यासभेस लायब्ररीचा एक मेंबर हजर ठेवण्याची परवानगी देण्यांत आली.

दरम्यान फक्त टाऊनहॉल, म्युनिसिपालीटीनें आपले ताब्यांत घेतला, लायब्ररीतर्फे पत्र व्यवहार करण्यांत आला, व म्यानेजिंग कमिटीची सभा होऊन टाऊन-हॉल म्युनिसिपालीटीनें लायब्ररीचे ताब्यात दिल्यास टाऊन--हॉलची दुरुस्ती व व्यवस्था करण्यास लायब्ररी तयार आहे, अगर जिमखाना लायब्ररीबरोबर ही जबाबदारी पत्करण्यास तयार असल्यास लायब्ररी निम्मे खर्च करण्यास तयार आहे असें कळविण्यांत आलें. परंतु याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ता. २२-१-३५ रोजीं म्युनिसिपालिटीची सभा होऊन म्युनिसिपालिटीनें टाऊन हॉलची दुरुस्ती आपले खर्चानें करावी, टाऊन हॉल लायब्ररीस वापरण्याकरितां द्यावा व त्याबद्दल दस्तैवज योग्य शर्तींवर त्याचेकडून करून घ्यावा, करंट रिपेर लायब्ररीनें करावा, टाऊन हॉलचा उपयोग म्युनिसिपालिटीस ज्या वेळेस करावा लागेल त्यावेळेस लायब्ररीनें म्युनिसिपालिटीस दिला पाहिजे व कोणत्याही सार्वजनीक कामाकरितां लायब्ररीनें टाऊन हॉलचा उपयोग जळगांवचे रहिवाशांस करूं दिला पाहिजे असा ठराव झाला. या ठरावांतील शर्ती कबूल आहेत असें लायब्ररीचे वार्षिक सभेंत ता. २७।१।३९ रोजीं ठरलें. पुढें दस्तायवजाचा मसुदा म्युनिसिपालिटीनें मागविल्यावरून ता. ७-९-३६ रोजीं पाठविण्यांत आला, परंतु म्युनिसिपालिटीकडून कांहीं पुढें तजवीज झाली नाहीं म्हणून ता. १३-७-३७ रोजीं पुन्हां सूचना करण्यांत आली. त्या पत्राचा विचार करून टाऊन हॉल लायब्ररीचे ताब्यांत देतां येत नाहीं, असा ठराव ता. २८ ७ ३७ रोजीं झाला. अशा रीतीनें टाऊन हॉलचे बाबतींत निदान सध्यां पुरता निकाल लागला आहे.

म्युनिसिपालिटीचे ता. २८-९ — १९०७ चे ठरावाप्रमाणें कायदेशीर दस्तैवज झाला नाहीं त्यामुळें लायब्ररी-कमिटीचे हक्कांवर कसें अतिक्रमण वेळोंवेळीं झालें, याचें दिग्दर्शन वर केलें आहे. एका संस्थेची निरनिराळीं शकलें झालीं, जिमखाना स्वतंत्र होऊन त्यास सर्व जागा व इमारत यांपैकीं एक भाग लायब्ररीचे संमती शिवाय तोडून देण्यांत आला. लायब्ररीनें कोणतीही शर्त मोडली नसतां, व टाऊन-हॉलची दुरुस्ती करण्यांस लायब्ररी तयार असतां अगर विकल्पेंकरून म्युनिसिपालिटीचे नवीन शर्तीं प्रमाणें दुरुस्त झालेला टाऊन हॉल आपले ताब्यांत घेण्यांस तयार असतां तो म्युनिसिपालिटीचे ताब्यांत गेला व लाय-ब्ररी ज्या भागांत आहे तो भागही म्युनिसिपालिटी आपले ताब्यांत घेण्यास प्रवृत्त झाली या सर्व गोष्टींचा विचार केला तर मन खिन्न झाल्याशिवाय रहात नाहीं.

लायब्ररीचे जागेचा कायदेशीर दस्तैवज म्युनिसिपालिटी कडून लवकर करून मिळेल अशी आशा आहे.

सन १९०९ सालीं जी इमारत बांधली, ती लायब्ररीचे कामास अपुरी पडूं लागल्यामुळें सन १९२१-२२ सालांत वरचा मजला बांधण्यांत आला. त्याचें छप्पर थोडेसें नादुरुस्त झालें होतें व ठेंग-णेंही होतें म्हणून टाऊन-हॉलची दुरुस्ती झाली, तेव्हांच सन १९३९ सालांत वरचें मजल्याचें छप्पर दुरुस्त करून टाऊन-हॉलचे छपराचे बरोबरीनें वरचा मजला उंच करून घेतला व त्यानंतर १९३६ सालांत तळ-

मजल्यावर भिंतींतील २ मोठीं कपाटें करून घेतलीं, त्यामुळें लायब्ररीच्या पुस्तकांची चांगली व्यवस्था करतां आली.

म्युनिसिपालिटीनें पोलन पेठेंत, व विठ्ठलपेठेंत मोफत वाचनालयें ठेविलीं आहेत, तीं २०० ते २५० रु.पर्यंत ग्रँट म्युनिसिपालिटी कडून घेऊन चालविण्यास द. वा. लायब्ररी तयार आहे किंवा नाहीं, याबद्दल सन १९३२ सालांत विचारणा केली होती, परंतु त्या रकमेंत म्युनिसिपालिटीचे शर्तीप्रमाणें व्यवस्था करणें अशक्य असल्यामुळें, लायब्ररीस म्युनिसिपालिटीची विनंति मान्य करतां आली नाहीं.

याप्रमाणें लायब्ररीचे स्थापनेपासून आजपर्यंतचा वृत्तांत सादर केला आहे. लायब्ररीसंबंधीं इतर माहिती संक्षिप्तपणें खालीं नमूद करित आहोंत.

वर्गणीदार:— पूर्वी वर्गणीदारांचे १ रु., आठ आणे व चार आणे देणारे असे तीन वर्ग होते. सन १९१० पासून २ रु. देणाऱ्यांचा एक, व विद्यार्थी यांचा एक, असे पांच वर्ग केले. लायब्ररीचे सुरवातीस १० च वर्गणीदार होते. १८९० मध्यें २४, १९०० मध्यें ५५, १९१० मध्यें १७८, १९१७ मध्यें ३३२, व १९२३ मध्यें ६९२ या प्रमाणें वर्गणीदारांची संख्या वाढत जाऊन सन १९२४ मध्यें लायब्ररीनें ७०३ चा उच्चांक गांठला, परंतु दुर्दैवानें ह्यापुढें वर्गणीदारांची संख्या अवघी ३३२ च आहे, ह्या घटीची १-२ कारणें उघड दिसत आहे. अलिकडे वर्तमानपत्राची उत्पत्ती व खप फार वाढला आहे, त्यामुळें मुद्दाम जगद्वृत्त कळण्याकरिता लायब्ररींत येण्यापेक्षां दाराशीं विकायला येणाऱ्या पोराजवळूनच दीडकी दोन दिडकीचें वर्तमानपत्र विकत घेऊन वाचणारेही बरेच लोक आहेत. गांवाची वाढ झपाट्यानें होत असल्यानें लायब्ररीही पुष्कळांस दूर पडूं लागली आहे, शिवाय म्युनिसिपालिटीनें गांवांतील १-२ विभागांत मोफत वाचनालयेंही उघडलीं आहेत.

२ रु. देणारे पहिल्यावर्गाचे वर्गणीदारांची संख्या सर्वसाधारण २ च होती. नाहीं म्हणायला सन १९२३ मध्यें ती ६ वर गेली, परंतु खेदाची गोष्ट ही कीं १९३३ सालापासून ह्या दराचा हल्लीं एकही वर्गणीदार नाहीं. लायब्ररीनें विद्यार्थीवर्ग जरी १९१० पासून सुरू केला, तरी १९२३ पर्यंत विद्यार्थ्यांनीं लायब्ररीचा फारसा फायदा घेतला नाहीं. १९२३ व १९२४ मध्यें ह्या वर्गांत १२० व १६० अनुक्रमें वर्गणीदार होते, परंतु अनुभव असा आला कीं, कांहीं विद्यार्थी पुस्तकें नीटनेटकेपणानें वापरीत नसत त्यामुळें पुस्तकें फार लवकर खराब होत, व बरेचसे विद्यार्थी एप्रीलमध्यें पुस्तक नेऊन शालेय परिक्षा संपल्यानंतर पुस्तकाबरोबरच लायब्ररीचा कायमचा निरोप घेत. ह्या गोष्टीस आळा घालण्याकरितां डिपॉझिट घेण्याची पद्धत सुरू करणें जरूर पडलें. त्यामुळें ह्या वर्गाची संख्या अर्थातच कमी झाली. हल्लीं ती संख्या ३३ आहे. प्रतिवर्षी गांवची लोकसंख्या वाढत असतां लायब्ररीचे वर्गणीदारांची संख्या कमी होंत आहे. ही खरोखरच विचित्र घटना आहे. परंतु सध्यांच्या जागतिक मंदीचे दिवसांत व वर नमूद केलेली परिस्थिती लक्षांत घेतां आलेल्या परिस्थितीस निमूटपणें तोंड देऊन ही दुःखस्थिती सुधारण्याचा प्रयत्न लायब्ररी यथाशक्ति करीत आहे. नागरीकही ही दुःस्थिती सुधारण्याचें कामीं आम्हांस यथाशक्ति मदत करतील अशी आमची त्यांना नम्र विनंति आहे.

**वर्गणी**:- वर्गणीदारांचे संख्येबरोबरच वर्गणीचा आंकडा हेलकावा खात आलतो. १८८८ मध्यें २०९ रु. वर्गणी रूपानें लायब्ररीस मिळालें. १९०४ पर्यंत, ह्या रकमेंत स्पृहणीय अशी वाढ झाली नाहीं परंतु १९०९ पासून मात्र १९२३ पर्यंत हा आंकडा सारखा वाढतच गेला. १९०९ मध्यें ३१४ रु., १९१९ मध्यें १०१९ रु., १९२३ मध्यें १९७१ रु., अशी वर्गणी मिळाली. १९२९ मध्यें वर्गणी २१३३ रु. मिळून संस्थेनें उच्चांक गांठला. परंतु ह्यापुढें एकसारखी ओहोटीच सुरू झाली. गेल्यावर्षी ९९३ रु. ४ आ. वर्गणी मिळाली.

देणगीः— लायब्ररीचे उत्पन्नाबद्दल विचार करितांना, वर्गणी बरोबर लायब्ररीला मिळणाऱ्या देणग्यांचाही उल्लेख करणें जरूर आहे. किंबहुना, असेंच ह्मणावें लागेल कीं, आह्मांस मिळालेल्या देणग्या मिळाल्या नसत्या, तर कदाचित आहे ह्या स्वरूपांत संस्था आपणांस आज दिसली नसती, ह्मणूनच आपल्या दात्यांचे स्मरण केल्याखेरीज या षठयद्धीची पूर्ती होणार नाहीं. आह्मांस एकदांच एक मोठी रकम देऊन संस्थेची इमारत बांधण्याचें कामास ४००० रु. ची मदत करून, येथील मुळजी जेठा कंपनीनें कायमचे ऋणी करून ठेविलें आहे; ह्या संस्थेस सदरचे कंपनीचे मालकांपैकीं एक श्रीमंत शेट वल्लभदास वालजी ह्यांचें नांव देऊन संस्थेनें जरी आपली थोडीशी कृतज्ञता व्यक्त केली असली, तरी एवढ्यानें दाता व याचक यांचे संबंध कमी होत नसतात; आमच्या सभ्यांचे परिस्थीतींत सदरे कंपनी उदार अंतःकरणानें पुन्हा आम्हांस हातभार लावील, अशी अपेक्षा करणें वावगें होणार नाहीं. लायब्ररीचे इमारत फंडाकरितां येथील म्युनिसिपालिटीनेंही १०० रु. देणगी दिलेली आहे, हेंही कृतज्ञतेनें आह्मी येथें नमूद करितों.

म्युनिसिपालिटीनें आह्मांस सुरवातीपासूनच उपकृत करून ठेविलें आहे. संस्थेचे जन्मापासून म्युनिसिपालिटी दरसाल ५० रु. देणगी देत आहे. सन १८९४ पासून ही रकम वाढवून १६० रु. देण्यास सुरवात केली, व १९२६ पासून २५० रु. देण्यास सुरवात केली, ही गोष्ट खरोखर अभिनंदनीय आहे. लोकसंख्येच्या वाढीबरोबर झालेली ही वाढ पाहून कोणासही आनंदच वाटेल. परंतु परमेश्वराची इच्छा आह्मांस ह्या आनंदाचा उपभोग पुढें निर्वेधपणें घेऊं देण्याचा दिसत नाहीं. आजच्या आनंदोत्सवाचे प्रसंगीं नमूद करण्यांस वाईट वाटत असेल तर ते एकाच गोष्टीचे, लायब्ररी फ्री रिडिंग रूम ठेवित असेल, तरच देणगी चालू राहील, नाहींतर ती बंद करून मोफत वाचनालयाकडे खर्च केली जाईल, असें, आह्मांस म्युनिसिपालिटीनें कळविलें. संस्थेच्या सभ्यांचे स्थितींत संस्थेस ही शर्त कबूल करणें शक्य वाटेना ह्मणून आह्मांस बिनशर्त देणगी पूर्वीप्रमाणेंच द्यावी, अशी म्युनिसिपालिटीस आह्मी विनंति केली, परंतु ती अमान्य झाली. गांवांत मोफत वाचनालयें असूं नयेत असें आमचें ह्मणणें नाहीं, परंतु ह्या संस्थेंतच मोफत वाचनालय उघडल्यास त्यामुळें खर्च वाढेल व लायब्ररीची जागा लहान असल्यामुळें वर्गणीदारांस अडचण होऊन वर्गणीदारांचे संख्येंत तात्काळ फरक पडेल, व त्यामुळें लायब्ररीचें उत्पन्नही घटेल; व आपल्या गांवास ह्या संस्थेच्या रूपानें हें जें एक नमुनेदार ग्रंथालय आहे, त्याची उपयुक्तता कमी होत जाईल अशी आह्मांस भिती वाटत आहे. पुष्कळ वाचनालयें काढलीं तरी त्यामुळें ग्रंथालयाची आवश्यकता केव्हांच कमी होत नाहीं, आज जगांत जे निरनिराळे विचार प्रवाह वाहत आहे, त्यासंबंधीचें वाङ्मय आपले ग्रंथालयांत असणें जरुरीचें आहे. असो. अशा परिस्थितींत विचार करून आम्ही असें टरविलें कीं, म्युनिसिपालिटीनें घातलेली अट पत्करून अनुभव घेवून पहावा, ह्मणून म्युनिसिपालिटीची अट आह्मी मान्य करून फ्री रिडींगरूमची व्यवस्था केली आहे. ह्या संस्थेस पैशाशिवाय पुस्तकरुपानेही पुष्कळ सद्गृहस्थांनीं मदत केलेली आहे, व प्रतिवर्षीं करित आहेत, तसेंच १९३६ सालीं जळगांव येथें २१ वें महाराष्ट्र साहित्य संमेलन झालें, त्या संमेलनाचे स्वागत मंडळानें लायब्ररीस भेटीदाखल रु. २०१ ची मराठी पुस्तकें दिलीं. या प्रेमानें दिलेल्या देणगीबद्दल लायब्ररी त्यांची फार आभारी आहे. व इतर नागरीकही संस्थेवर असेंच प्रेम दाखवितील अशी आशा आहे.

पुस्तकें:— ग्रंथालयाचा अहवाल लिहितांना त्यांतील पुस्तकांविषयीं न लिहिणें हें रामावांचून रामायण लिहिण्यासारखें होणार आहे. असो, संस्थेच्या बाल्यावस्थेंत ग्रंथ संपत्ती वाढविणें चालकांस फारसें शक्य नव्हतें असें दिसतें, कारण १८९९ पर्यंत साधारणपणें प्रतिवर्षीं २५–३० रु. पर्यंतच रकम खर्चीं पडत असे. तरीपण १९०० सालीं ग्रंथ संख्या ८७५ होती. हा आंकडा प्रतिवर्षा वाढतच आहे, ही विशेष आनंदाची गोष्ट आहे. मध्यंतरीं कांहीं वर्षीं जरी ग्रंथ संख्या कमी झालेली दिसत असली, तरी त्या त्या सालीं पुस्तकांची नीट पाहाणी करून फाटलेलीं व निरुपयोगीं झालेलीं पुस्तकें काढून टाकण्यांत आलेलीं आहेत. त्यामुळें संख्या कमी झालेली दिसते. जगांत जे नवविचार चालू आहेत, त्याबद्दलचे प्रसिद्ध होणारें वाङमय वर्गणीदारांपुढें ठेवण्याचा शक्त्यनुसार लायब्ररी

प्रयत्न करीत आहे. ललित वाङमयाकडे पुष्कळांचा ओढा आहे. म्हणून वाचकांची तीही आवड पुरविण्याचा आम्हीं बराच प्रयत्न करित आहोंत. इतिहास, बखरी, राजकारण, चरित्रापासून ते हुन्नरकला, शास्त्रीय, वैद्यकीय, शेतकी, ड्राइंग वगैरे सर्व विविध विषयांचीं पुस्तकें आमचे लायब्ररींत आहेत. शिवाय महत्वाचीं व नित्योपयोगीं रेफरन्सचीं पुस्तकही लायब्ररींत आहेत. एखाद्या विवक्षित विषयाचा एकाग्रास अभ्यास करणें असेल तर तोही आपले ग्रंथालय पाहून नाराज होणार नाहीं. सारांश, वर्गणीदारांच्या सर्व तऱ्हेच्या आवडी निवडीकडे लक्ष देऊन, पुस्तकें लायब्ररींत ठेविलीं आहेत, व कोणी कांहीं सूचना केल्यास तिकडेही अवश्य लक्ष देण्यांत येतें. आजची लायब्ररीची ग्रंथ संपत्ती मराठी २८०३, इंग्रजी १६२३, हिंदी ९६, गुजराथी ४३७, अशी एकूण ४९५३ आहेत. वाढीचे दृष्टीनें हा आंकडा खरोखरच भूषणास्पद आहे. परंतु प्रतिवर्षीं खर्चीं पडणाऱ्या रकमेंत, उत्पन्नाचे प्रमाणांत दरसाल घट होत आहे. ही गोष्ट नमूद करण्यास खेद वाटतो. १९२४ मध्यें पुस्तकांप्रीत्यर्थ ८०७ रु. खर्चीं पडले, तर गेल्या वर्षीं ३३१ रु. खर्चीं पडले

वर्तमानपत्रें:- सन १८८८ सालीं मासिकांसह वृत्तपत्रांची संख्या १७ होती. प्रतिवर्षीं ही संख्या वाढतच होती. १९०० मध्यें २४, १९१० मध्यें २८, १९२३ मध्यें ५७ ह्याप्रमाणें वाढ होऊन सन १९२४ मध्यें हा आंकडा ७४ पर्यंत गेला, परंतु तेव्हांपासून ही संख्या आर्थिक परिस्थितीमुळें कमी होऊं लागली आहे. आजची ही संख्या ४६ आहे. त्यांत ५ दैनिकें, २० साप्ताहिकें व २१ मासिकें आहेत. सन १९२४ मध्यें ५७१ रु. खर्चीं पडले, तर गेल्यावर्षी २७५ रु. खर्चीं पडले.

लायब्ररीचा हा अहवाल लिहितांना, ह्या संस्थेची सतत २२ वर्षेपर्यंत चिटणिसाचें कामकरून कै. आबासाहेब ह्याळस ह्यांनीं जी सेवा केली त्याबद्दल त्यांचे स्मरण करणें आपलें पवित्र कर्तव्य आहे. तसेंच ह्याप्रसंगीं, कै. भाऊसाहेब नूलकर, कै. भास्कर बल्लाळ आपटे, कै. पुरुषोत्तम जीवनदास अंजारिया शेट, कै. अप्पासाहेब अणिगिरीकर व श्री. बापुसाहेब खानवाले, अण्णासाहेब रानडे, काकासाहेब असगेकर, रावसाहेब रावेरकर वगैरे सदगृहस्थांचीही आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. या सर्वांचे परिश्रमामुळेंच ह्या संस्थेस, आजचें स्वरूप प्राप्त झाले आहे हें म्हणणें वावगें होणार नाहीं. असो. लायब्ररीचे परिस्थितींत वेळोवेळीं कसा फेरबदल होत गेला, हें वरील विवेचनावरून लक्षांत येण्यासारखें आहे. द्रव्यबल कार्याचे मानानें अपुरे पडत असल्यामुळें लायब्ररींत जशी सुधारणा करणें जरूर आहे, तशी करणें अशक्य झालें आहे. लायब्ररींतील नोकरांचे पगाराचे स्केल ठरविणें, फर्निचर घेणें, व लायब्ररी सर्व प्रकारें उपयुक्त व नमुनेदार संस्था करण्याकरितां ज्या अनेक गोष्टी करणें जरूर आहे, त्या करण्याकरितां लायब्ररीस मदतीची जरूरी आहे. व्यक्ति ५५ अगर ६० वर्षांचें आयुष्यानंतर सेवानिवृत्त होण्यास पात्र होतात, परंतु सार्वजनिक संस्थांची स्थिति याचे अगदीं उलट असतें. अशा संस्था जितक्या जुन्या होतात. त्यामानानें त्यांची बळकटी वाढत जाते, व त्यांस स्थैर्य प्राप्त होतें. या संस्थांची अभिवृद्धि करणें, व त्यांस जोमदार बनविणें, हें लोकाश्रयावर अवलंबून असते. तरी शेवटीं एवढीच प्रार्थना आहे कीं, येथील म्युनिसिपालिटीनें व उदार धनिकांनीं पूर्वींप्रमाणेंच उदार अंत:करणानें मदत करून ही संस्था आपलीच आहे असें मानून तिचे प्रगतीस होईल तेवढे साह्य करावें.

परमेश्वर संस्थेस चिरायु करो ! !

वि. ना. देशमुख
रा. बा. किन्हीकर
सेक्रेटरी

हरी विष्णु कोल्हटकर,
अध्यक्ष.

जळगांव विजया दशमी शके १८५९
ता. १४ आक्टोबर १९३७

( सहजानन्द प्रे. ज. )